**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** बार्शी शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0330 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/04/2025 00:45

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 25/02/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/04/2025
**Time From (वेळेपासून):** 15:25 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/04/2025 **Time (वेळ):** 00:32 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/04/2025 00:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय बार्शी,तलाठी कार्यालय बार्शी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दत्तात्रय सुरेश पाटील
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ताड सौंदणे,बार्शी ,बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ताड सौंदणे,बार्शी ,बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850848733

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती ऐश्वर्या धनाजी शिरामे | | | 1. सज्जा ताड सौंदणे,तहसिल कार्यालय बार्शी,बार्शी शहर, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री रवींद्र अगतराव भड | | | 1. तहसिल कार्यालय बार्शी,बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि:- 03/04/2025

मी दत्तात्रय सुरेश पाटील, वय 37 वर्षे, व्यवसाय - इन्शुरन्स एजंट, रा. मु. ताड सौंदणे, ता. बार्शी जि. सोलापूर, मो.क्रं. 9850848733, समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की,

मी दि. 24/02/2025 रोजी 16.25 वा. चे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक श्री महाडिक यांचेशी फोन द्वारे संपर्क साधुन लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावरुन पोनि महाडिक यांनी मला दि. 25/02/2025 रोजी 14.30 वा. चे सुमारास बार्शी ते मालवंडी रोडवर असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिर येथे येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी आलो असता तेथे काहीवेळातच पोनि महाडिक व त्यांचा स्टाफ असे शासकीय वाहनासह आले. तेथे पोनि महाडिक यांनी मला वाहनात बसण्यास सांगुन वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांची व माझी एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी मला माझी तक्रार विचारली असता त्यावर मी सांगीतलो की,

आमची ताड सौंदणे येथे गट नं. 160/02 व 162/03 मध्ये एकुण 1 हे. 14 आर वडीलोपार्जीत शेत जमीन असुन सदरची शेतजमीन माझी आई श्रीमती कमल सुरेश पाटील यांनी सन 2020 रोजी माझी पत्नी सौ रुपाली दत्तात्रय पाटील हिचे नावे केली होती. सदरची वर नमुद शेतजमीन आम्ही आमचा 06 महीन्याचा मुलगा कु. सौरभ दत्तात्रय पाटील याचे नावे करण्याचे ठरविले त्याअनुषंगाने महसुल अधिनियम कलम 85 अंतर्गत वाटप पत्र होवुन नमुद संपुर्ण शेतजमीन ही आमचा मुलगा कु. सौरभ दत्तात्रय पाटील, अ.पा. आई रुपाली दत्तात्रय पाटील असे वाटप होवुन मिळणेबाबत दि. 30/01/2025 रोजी प्रतिज्ञापत्र करुन इतर सर्व कागदपत्रांसह ताड सौंदणे तलाठी श्रीमती शिरामे यांचेकडे दि. 05/02/2025 रोजी सादर केले. त्यानंतर मी श्रीमती शिरामे यांना भेटुन सदर प्रकरणाचा पाठपुरावा केला असता तलाठी श्रीमती शिरामे यांनी येथे सर्व टेबलला काहीतरी रक्कम द्यावी लागते. त्याशिवाय तुमचा आदेशच निघत नाही असे म्हणाले. त्यावर मी त्यांना किती रुपये लागतील असे विचारले असता शिरामे मॅडम यांनी 20,000/- रुपये तुम्हाला माझ्याकडे आणुन द्यावे लागतील आणि येथील सर्वजण माझ्याकडुनच घेणार तुम्ही स्वत: विचारायला गेले तर तुमच्याशी कोणीही बोलणार नाही आणि तुमचे कामपण करणार नाहीत असे म्हणुन 20,000/- रुपये लाचेची मागणी केली. व काल दि. 24/02/2025 रोजी मला शिरामे मॅडम यांनी फोन करुन दि. 25/02/2025 रोजी दुपारी 3.30 वा. चे नंतर फोन करुन भेटण्याकरीता बोलाविले आहे. तरी तलाठी श्रीमती शिरामे यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर श्रीमती शिरामे यांचेवर पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने ठिकाण निश्चित करण्याकरीता तसेच तलाठी शिरामे यांनी 03.30 वा. फोन करण्यास सांगीतले असल्याने पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी माझा मोबाईल क्रं. 9850848733 वरुन तलाठी श्रीमती शिरामे यांचा मो.क्रं. 7888179620 वर फोन करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले असता, त्यामध्ये श्रीमती शिरामे यांनी आता झालय ते सगळ टपालामध्ये... वरती जातय ते सगळ असे म्हणाले त्यावर मी त्यांना चालतय ठिक हाय मॅडम असे म्हणुन फोन कट केला. सदरचे फोनवरुन झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करुन घेतले. तलाठी शिरामे यांचे सांगणेवरुन आजुन वेळ लागणार असल्याचे निष्पन्न झाल्याने आम्ही सदर ठिकाणीच श्रीमती शिरामे यांचे फोनची वाट बघत थांबलो.

त्यानंतर बराचवेळ होवूनही तलाठी शिरामे यांचा फोन न आलेने मी पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन पुन्हा माझा मो. क्रं. वरुन तलाठी श्रीमती शिरामे यांना 16.11 वा. चे सुमारास फोन करुन स्पिकर ऑन केला परंतु श्रीमती शिरामे यांनी माझा फोन रिसिव्ह केला नाही. त्यानंतर सुमारे 16.15 वा. चे सुमारास मला श्रीमती शिरामे यांचा फोन आला तो फोन मी रिसिव्ह करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले त्यामध्ये श्रीमती शिरामे यांनी आता साहेबांच्या सुनावण्या चालु असुन आजुन एक ते दिड तास लागेल असे सांगीतले. व तोपर्यंत मला माझी पत्नी व मुलगा यांना घेवुन येण्यास सांगुन फोन कट केला. सदरचे फोनवरुन झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करुन घेतले.
तलाठी श्रीमती शिरामे यांचे सांगणेप्रमाणे मला माझी पत्नी व मुलगा यांचेसह तहसिल कार्यालय बार्शी येथे जावे लागणार असल्याने मी माझ्या पत्नीला फोन करुन मुलासह तहसिल कार्यालय बार्शीच्या जवळ येवुन थांबण्यास सांगीतले. त्यानंतर सुमारे 01 तासानंतर 17.27 वा. चे सुमारास श्रीमती शिरामे यांचा मो.क्रं. वरुन माझ्या मो.क्रं. वर फोन आला तो फोन मी रिसिव्ह करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले त्यामध्ये श्रीमती शिरामे यांनी मला तहसिल कार्यालय येथील अस्थापना शाखेमध्ये येण्यास सांगुन फोन कट केला. सदरचे संभाषण पोनि महाडिक यांनी व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डवर ध्वनिमुद्रीत करुन घेतले.
तलाठी श्रीमती शिरामे यांनी मला तहसिल कार्यालय बार्शी येथे येण्यास सांगीतले असल्याने तलाठी श्रीमती शिरामे यांचेवर तहसिल कार्यालय बार्शी येथे पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच 01 यांना पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन तहसिल कार्यालय बार्शी येथे जाणेकरीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच 01 असे तहसिल कार्यालय बार्शी येथे जात असतेवेळी मला श्रीमती शिरामे यांचा फोन आला तो मी रिसिव्ह करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले त्यामध्ये श्रीमती शिरामे यांनी लवकर येण्यास सांगीतले त्यावर मी त्यांना रिक्षा वाला यायला लागलाय 2 ते 3 मिनीटात येतोय तुमच्या जवळ..असे सांगीतले. त्यानंतर मी व पंच असे तहसिल कार्यालय बार्शी जवळ जावुन तेथे माझी पत्नी व मुलाची वाट पाहत असताना मला पुन्हा श्रीमती शिरामे यांचा फोन आला तो फोन कॉल मी रिसिव्ह करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये श्रीमती शिरामे यांनी माझ्या अज्ञान मुलाचा जन्म दाखल्याची झेरॉक्स प्रत घेवुन येण्यास सांगीतले. त्यामुळे मी जवळच असलेल्या झेरॉक्स सेंटरवर माझे मोबाईलमध्ये असलेल्या जन्म दाखल्याची प्रिंट काढण्याकरीता गेलो. त्यावेळी श्रीमती शिरामे यांचा पुन्हा मला फोन आला तो फोन कॉल मी रिसिव्ह करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये श्रीमती शिरामे यांनी किती वेळ लागेल असे विचारले त्यावर मी जन्माच्या दाखल्याची..झेरॉक्स काढाय लागलो असे सांगीतले.
त्यानंतर मी माझा मुलगा सौरभ यांचे जन्म दाखल्याची प्रिंट काढली. दरम्यानच्या काळात माझी पत्नी व मुलगा असे सदर ठिकाणी आले. त्यानंतर आम्ही सर्वजण बार्शी तहसिल कार्यालयामध्ये गेलो. सदर ठिकाणी तलाठी शिरामे यांनी मला, माझी पत्नी व मुलगा यांना तहसिलदार यांचे समक्ष उभे केले. सदर ठिकाणी सर्व प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर मी माझी पत्नी व मुलगा यांना परत पाठविले व तलाठी श्रीमती शिरामे यांची भेट घेतली असता तलाठी शिरामे यांनी हळु आवाजात आणलेत की नाही असे विचारले त्यावर मी त्यांना काय असे विचारले असता श्रीमती शिरामे यांनी पैसे असे म्हणुन आदेशच काढत नाहीत त्याशिवाय असे म्हणाले त्यावर मी त्यांना क्लिअर सांगा काय असेल ते असे म्हणालो असता श्रीमती शिरामे यांनी हाताने पैसे मागणीचा इशारा करीत हे करा की.. दया त्यंना दयाव लागतय.. पटकन ते आदेश देतील...असे म्हणाले त्यावर मी त्यांना दयाय लागतय पण किती काय असे विचारले असता श्रीमती शिरामे यांनी 17,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी मॅडम पैशाची अँडजेस झाली नाही असा बहाणा सांगुन उदया तुम्ही सांगचाल त्या टाईमाला येतो..असे म्हणालो असता श्रीमती शिरामे यांनी चालतय.. या तुम्ही बार्शीत आलात की मला फोन करा..असे म्हणाले. त्यावर मी पंच 01 यांच्यासह पुन्हा पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.
झाले पडताळणी कारवाईमध्ये तलाठी श्रीमती शिरामे यांनी मला लाच रक्कम घेवुन दि. 26/02/2025 रोजी बार्शी येथे आल्यानंतर फोन करण्यास सांगितलेने पोनि महाडिक यांनी सदर दिवशीची पुढील कारवाई स्थगीत करुन तलाठी श्रीमती शिरामे यांचेवर दि. 26/02/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे नियोजित केले.
दि. 26/02/2025 रोजी पोनि महाडिक यांचे सुचनेप्रमाणे मी दुपारी 12.30 वा.चे सुमारास बार्शी पासून अलीकडे साधारण 2 कि.मी अंतरावर असलेल्या अनंतबाग नर्सरी जवळ रोडवर उपस्थित झालो. तेथे काही वेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने सापळा पथकासह उपस्थित झाले. व तेथे वाहनात दि. 25/02/2025 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम केलेले दोन्ही पंच उपस्थित होते. त्यानंतर पोनि महाडिक यांनी

त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये यापुर्वी पडताळणी कारवाईमध्ये वापरुन सिलबंद करुन ठेवलेले मेमरीकार्ड टाकले त्यानंतर श्रीमती शिरामे यांचेवर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने ठिकाण निश्चित करण्याकरीता पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी माझा मोबाईल क्रं. 9850848733 वरुन तलाठी श्रीमती शिरामे यांचा मो.क्रं. 7888179620 वर अनुक्रमे 13.09 वा., 13.10 वा., 13.30 वा. चे सुमारास असे एकुण 03 वेळा फोन केला परंतु तलाठी श्रीमती शिरामे यांनी फोन रिसिव्ह केले नाही त्यामुळे सदर दिवशी श्रीमती शिरामे यांची भेट होवु शकली नाही. त्यामुळे पोनि महाडिक यांनी सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगीत करुन तलाठी श्रीमती शिरामे यांचेवर दि. 27/02/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे नियोजित केले.

त्यानंतर दि. 27/02/2025 रोजी पोनि महाडिक यांचे सुचनेप्रमाणे मी 12.30 वा. सुमारास बार्शी ते मालवंडी रोडवर असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिर येथे उपस्थित झालो. तेथे काही वेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने सापळा पथकासह उपस्थित झाले. व तेथे वाहनात दि. 25/02/2025 व दि. 26/02/2025 रोजी झालेल्या कारवाईमध्ये पंच म्हणून काम केलेले दोन्ही पंच उपस्थित होते. त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये यापुर्वी पडताळणी व सापळा कारवाईमध्ये वापरुन सिलबंद करुन ठेवलेले मेमरीकार्ड टाकले त्यानंतर श्रीमती शिरामे यांचेवर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने ठिकाण निश्चित करण्याकरीता पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी माझा मोबाईल क्रं. 9850848733 वरुन तलाठी श्रीमती शिरामे यांचा मो.क्रं. 7888179620 वर 12.55 वा. सुमारास फोन करुन भेटायच होत कुठ भेट होईल असे विचारले असता श्रीमती शिरामे यांनी ते भोयरे येथे असुन सदर ठिकाणी अँग्री स्टॅग चा कॅम्प चालु असल्याबाबत सांगीतले. त्यावर मी त्यांना तेथे येवु का असे विचारले असता तलाठी शिरामे यांनी त्यास नकार दिला. सदरचे संभाषण पोनि महाडिक यांनी व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डवर ध्वनिमुद्रीत करुन घेतले.

त्यामुळे त्यांचे फोनची वाट पाहण्याचे व त्यांचा फोन आलेनंतर पुढील कार्यावाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तलाठी श्रीमती शिरामे या मौजे भोयरे येथे असलेने त्यांनी फोन करून भोयरे येथे बोलावलेस त्यांचेवर तेथे सापळा कारवाई करणे सोयीचे व्हावे यासाठी बार्शी एमआयडीसी येथे जावून तलाठी शिरामे यांचे फोनची वाट पाहत थांबलो. त्यानंतर सुमारे 14.40 वा. चे सुमारास श्रीमती शिरामे यांचा मला फोन आला तो फोन रिसिव्ह करुन स्पिकर ऑन करुन संभाषण केले त्यामध्ये श्रीमती शिरामे यांनी मला भेटण्याकरीता भोयरा येथे बोलाविले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यामुळे तलाठी श्रीमती शिरामे यांचेवर भोयरे येथे सापळा कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहनात सापळा कारवाईच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही पुर्ण केली. व तलाठी श्रीमती शिरामे यांचेवर सापळा कारवाई करीता आवश्यक 17,000/- रुपयांची मागणी केली असता मी माझेकडे असलेले 500/- रु दराच्या 34 नोटा हजर केल्या. पोनि महाडिक यांनी त्यांचे नंबर नोंदवून घेतले. व मी हजर केलेली लाच रक्कम 17,000/- रुपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन त्यास रबर बॅन्ड लावुन सदरच्या नोटांचा बंडल माझ्या नेसते पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवण्यात आले.

त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. तलाठी शिरामे यांनी मला भोयरे येथे येण्यास सांगीतलेने तलाठी शिरामे यांचेवर भोयरे येथे सापळा कारवाई करण्याकरीता पोनि महाडिक यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन भोयरे येथे जाणे करीता 14.54 वा. चे सुमारास रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन येवुन भोयरे गावातील मेनरोड वरील असलेल्या बस स्टॅाप परिसरात सापळा लावुन थांबले.

मी व पंच 01 असे भोयरे गावात मेन रोडवरील बस स्टॉप येथे गेलो. तेथे तलाठी शिरामे हया दिसून आले नसलेने मी त्यांना फोन करून भोयरे मध्ये कुठ यायच, मी मेन रोडवर बस स्टॉप पशी आहे असे सांगितले असता त्यांनी थांबा एक मिनीट मी आले असे म्हणाले. त्यामुळे मी व पंच असे बस स्टॉप परिसरातच थांबून राहीलो. काही वेळातच तलाठी शिरामे या त्यांचेकडील एक्सेस मो. सायकलवरून बस स्टॉप जवळ आम्ही थांबलेल्या ठिकाणी आल्या. तेथे माझे प्रलंबीत कामाचे अनुषंगाने चर्चा करुन सदर प्रकरणावर माझे पत्नीची एक सही राहीली असलेचे सांगितले. त्यावेळी मी त्यांचे मागणीप्रमाणे आणलेली लाच रक्कम त्यांचे समोर धरली असता ती लाच रक्कम घेण्यास त्यांनी नकार देवुन पैसे न घेताच परत निघून गेल्या. त्यामुळे मी व पंच असे लाच रक्कम स्विकारलेचा इशारा न करता परत शासकीय वाहन थांबले होते त्या ठिकाणी आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंचांना विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरवरील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून खात्री केली. तलाठी शिरामे यांनी माझेकडुन लाच रक्कमेचा स्विकार

केला नसल्याने सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली व यानंतर तलाठी शिरामे यांनी लाच रक्कमेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तसेच फोनव्दारे संपर्क केल्यास तात्काळ पोनि महाडिक यांना कळविणेबाबत त्यांनी सुचना दिल्या.
त्यानंतर दि. 17/03/2025 रोजी मी माझ्या भावाचे ग्राहक सुविधा केंद्रावर उपस्थित असताना तेथे माझी श्रीमती शिरामे यांचेशी भेट झाली सदरवेळी मी त्यांना माझ्या प्रलंबित कामाच्या अनुषंगाने विचारणा केली असता त्यांनी माझे काम लिपिक भड यांचेकडे प्रलंबित असुन त्यांना भेटा व 17,000/- रुपये देखील त्यांचेकडेच द्या असे सांगीतले. त्यामुळे मी तहसिल कार्यालय बार्शी येथे जावुन लिपिक भड यांची भेट घेतली असता त्यांनी मला दि. 18/03/2025 रोजी दुपारी 01.30. वा.चे सुमारास तहसिल कार्यालय बार्शी येथे येण्यास सांगीतले. सदरबाबत मी व्हॉटस् अँप कॉल करुन पोनि महाडिक यांना सांगीतले. त्यावर पोनि महाडिक यांनी मला बार्शी ते मालवंडी रोडवर असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिर येथे दि. 18/03/2025 रोजी दुपारी 01.00 वा. सुमारास येवुन थांबण्यास सांगितले.
त्याप्रमाणे मी दि. 18/03/2025 रोजी मी दुपारी 01.00 वा. सुमारास बार्शी ते मालवंडी रोडवर असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिर येथे येवुन थांबलो. सदर ठिकाणी काही वेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने सापळा पथकासह उपस्थित झाले. व तेथे वाहनात यापुर्वी झालेल्या कारवाईमध्ये पंच म्हणून काम केलेले दोन्ही पंच उपस्थित होते. सदर ठिकाणी मी पुन्हा पंचासमक्ष दि. 17/03/2025 रोजी घडलेली हकीकत सांगीतली. त्यावरुन लिपिक भड यांचेवर सापळा कारवाई करण्याचे तसेच लागलीच श्रीमती शिरामे यांना देखील ताब्यात घेण्याचे ठरविण्यात आले. त्याअनुषंगाने पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिति मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये यापुर्वी पडताळणी व सापळा कारवाईमध्ये वापरुन सिलबंद करुन ठेवलेले मेमरीकार्ड टाकले त्यानंतर श्रीमती शिरामे यांचे सांगणेप्रमाणे लिपिक भड यांचेवर सापळा कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहनात सर्व सापळापुर्व कार्यवाही पुन्हा केली. व यापुर्वी तलाठी श्रीमती शिरामे यांचेवर करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान वापरण्यात आलेली अ.पा. लावलेली लाच रक्कम 17,000/- रुपयांना पुन्हा अ.पा. लावुन सदरच्या नोटांचा बंडल माझ्या नेसते पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवण्यात आले.
त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. व व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन लिपिक भड यांचेवर सापळा कारवाई करीता तहसिल कार्यालय बार्शी येथे जाणेकरीता 13.24 वा. चे सुमारास रवाना केले. तसेच पोनि महाडिक, पंच 02 असे तलाठी कार्यालय बार्शी येथे जावुन श्रीमती शिरामे यांना ताब्यात घेण्याचे अनुषंगाने सापळा लावुन थांबले व उर्वरीत सापळा पथक हे आमचे पाठोपाठ तहसिल कार्यालय बार्शी येथे सापळा लावुन थांबले.
मी व पंच 01 असे तहसिल कार्यालय बार्शी येथे जावून लिपिक भड यांची भेट घेतली व सदर ठिकाणी मी त्यांचेशी माझ्या कामाच्या अनुषंगाने चर्चा करुन मॅडम म्हणल्याप्रमाणे आणल्यात पैसे असे सांगीतले. परंतु सदरवेळी लिपिक भड यांनी माझेकडुन लाच रक्कमेचा स्विकार न करता तुम्ही झाल्यावर दया पैसे असे म्हणुन लागलीच पैसे घेण्यास नकार दिला. त्यामुळे मी लाच रक्कम स्विकारलेचा नियोजित इशारा न करता परत स्वामी समर्थ मंदीर येथे आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंचांना विचारुन तसेच व्हाईस रेकॉर्डरवरील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकून खात्री केली. लिपिक भड यांनी देखील माझेकडुन लाच रक्कमेचा स्विकार केला नसल्याने सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगीत करण्यात आली व यानंतर तलाठी शिरामे किंवा लिपिक भड यांनी लाच रक्कमेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तसेच फोनव्दारे संपर्क केल्यास तात्काळ पोनि महाडिक यांना कळविणेबाबत त्यांनी सुचना दिल्या.
त्यानंतर आज दि. 03/04/2025 रोजी दुपारी 12.30 वा. चे सुमारास मी तलाठी शिरामे यांना माझ्या प्रलंबित कामाच्या अनुषंगाने फोन केला तो त्यांनी रिसिव्ह केला नाही. त्यानतर दुपारी 12.33 वा. चे सुमारास मला श्रीमती शिरामे यांचा फोन आला त्यावेळी मी त्यांना माझे प्रलंबित कामाचे अनुषंगाने विचारणा केली असता त्यांनी मला त्यांचे कार्यालयात येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बार्शी येथील त्यांचे कार्यालयमध्ये जावुन भेट घेतली असता श्रीमती शिरामे यांनी माझे सर्व उतारे तयार होवुन काम पुर्ण झाले असल्याबाबत सांगीतले. तसेच ठरलेल्या रक्कमेबाबत माझ्याकडे विचारणा केली. त्यावर मी त्यांना अता माझ्याकडे नसुन सायं 05.30 वा. चे सुमारास घेवुन येतो असे सांगीतले. त्यावर त्यांनी होकार दिल्याने मी सदरबाबत तात्काळ पोनि महाडिक यांना घडलेली हकीकत व्हॉटस् अँप कॉल करुन सांगीतली. त्यावर पोनि महाडिक यांनी मला बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटल येथे सायं 05.15 वा. चे सुमारास येवुन थांबण्यास सांगितले.
त्याप्रमाणे मी आज दि. 03/04/2025 रोजी मी सायं 05.15 वा. चे सुमारास बार्शी येथील जगदाळे मामा

हॉस्पिटल येथे येवुन थांबलो. सदर ठिकाणी काही वेळातच पोनि महाडिक शासकीय वाहनाने सापळा पथकासह उपस्थित झाले. सदर ठिकाणी मी पुन्हा पंचासमक्ष आज रोजी घडलेली हकीकत सांगीतली. त्यावरुन श्रीमती शिरामे यांचेवर सापळा कारवाई करण्याचे तसेच लागलीच लिपिक भड यांना देखील ताब्यात घेण्याचे ठरविण्यात आले. त्याअनुषंगाने पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये यापुर्वी पडताळणी व सापळा कारवाईमध्ये वापरुन सिलबंद करुन ठेवलेले मेमरीकार्ड टाकले त्यानंतर श्रीमती शिरामे यांचेवर सापळा कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी शासकीय वाहनात सर्व सापळापुर्व कार्यवाही पुन्हा केली. व यापुर्वी सापळा कारवाई दरम्यान वापरण्यात आलेली अ. पा. लावलेली लाच रक्कम 17,000/- रुपयांना पुन्हा अ.पा. लावुन सदरच्या नोटांचा बंडल माझ्या नेसते पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवण्यात आले.
त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. व व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन श्रीमती शिरामे यांचेवर सापळा कारवाई करीता तलाठी कार्यालय बार्शी येथे जाणेकरीता 17.33 वा. चे सुमारास रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 असे तलाठी कार्यालय बार्शी येथे जावुन श्रीमती शिरामे यांना ताब्यात घेण्याचे अनुषंगाने सापळा लावुन थांबले व उर्वरीत सापळा पथक हे तहसिल कार्यालय बार्शी येथे जावुन लिपिक भड यांना ताब्यात घेण्याचे अनुषंगाने सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे तलाठी कार्यालय बार्शी येथे जावून श्रीमती शिरामे यांची भेट घेतली सदर ठिकाणी श्रीमती शिरामे यांनी माझे प्रलंबित काम पुर्ण झाल्याचे सांगुन माझा मुलगा सौरभ यांचे नावाचे उतारे दिले. व हाताने पैसे मागणीचा इशारा करुन लाच रक्कमेची मागणी केली त्यावर मी माझ्या नेसते पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवण्यात आलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली व 17 आहेत मोजुन घ्या असे सांगीतले. त्यावर श्रीमती शिरामे यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे जवळ असलेल्या काळया रंगाच्या सॅग मध्ये ठेवले. त्यानंतर मी कार्यालयाच्या बाहेर येवुन पोनि महाडिक यांना दिसेल असा लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला. त्यावरुन पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन त्यांनी श्रीमती शिरामे यांना पकडले. व पोनि महाडिक यांनी सापळा पथकातील पोहवा घाडगे यांना फोन करुन लिपिक भड यांना ताब्यात घेण्याबाबत कळविले.
तलाठी कार्यालय बार्शी येथे पोनि महाडिक यांनी श्रीमती शिरामे यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कु. ऐश्वर्या धनाजी शिरामे, वय 27 वर्षे, पद – तलाठी, (वर्ग- 3) नेम- सज्जा ताड सौंदणे, तहसिल कार्यालय बार्शी रा. अरीहंत बोपलकर हॉस्पिटल समोर, देवकर प्लॉट बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी कार्यालयीन खोलीमध्ये लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून तलाठी श्रीमती शिरामे यांना ताब्यात घेवुन तहसिल कार्यालय बार्शी येथे आले. सदर ठिकाणी सापळा पथकातील सदस्यांनी ताब्यात घेतलेले लिपिक भड यांना पोनि महाडिक यांनी नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री रवींद्र अगतराव भड, वय 56 वर्षे, पद – महसुल सहा., (वर्ग- 3) नेम- तहसिल कार्यालय बार्शी रा. अंबिका गृह निर्माण सोसायटी, अमन चौक, बारंगुळे प्लॉट, परांडा रोड बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर असे असल्याचे सांगीतले.
त्यानंतर महसुल सहा. भड यांना देखील ताब्यात घेवुन पुढील सविस्तर सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह बार्शी येथे पूर्ण करण्यात आली.
तरी दि. 25/02/2025 रोजीचे 15.25 वा. सुमारापासुन ते दि. 03/04/2025 रोजीचे 17.47 वा. पावेतोचे दरम्यान लोकसेवक श्रीमती ऐश्वर्या धनाजी शिरामे, पद – तलाठी, (वर्ग- 3) नेम- सज्जा ताड सौंदणे, तहसिल कार्यालय बार्शी यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरूपयोग करून माझे पत्नीचे नावे असलेली शेत जमीन माझा 06 महीन्याचा मुलगा कु. सौरभ दत्तात्रय पाटील यांचे नावे करण्याकरीता महसुल अधिनियम कलम 85 अंतर्गत वाटपपत्र करण्याचा प्रस्ताव तयार करुन तो तहसिलदार बार्शी यांचेकडुन मंजुर करुन त्याबाबतचे आदेश काढण्याकरीता तलाठी श्रीमती शिरामे यांनी स्वत: करीता तसेच इतरांकरीता असे म्हणुन तहसिल कार्यालय बार्शी येथे 17,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम तलाठी कार्यालय बार्शी येथे स्वत: स्विकारली आहे. तसेच यातील लोकसेवक श्री रवींद्र अगतराव भड, वय 56 वर्षे, पद – महसुल सहा., (वर्ग- 3) नेम- तहसिल कार्यालय बार्शी यांनी तलाठी शिरामे यांचे लाच मागणीस संमती तसेच प्रोत्साहन देवुन बेकायदेशीर वर्तन केले आहे म्हणुन माझी लोकसेवक 1) श्रीमती ऐश्वर्या धनाजी शिरामे, पद – तलाठी, नेम- सज्जा ताड सौंदणे, तहसिल कार्यालय बार्शी 2) श्री रवींद्र अगतराव भड, पद – महसुल सहा., (वर्ग- 3) नेम- तहसिल कार्यालय बार्शी यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

(उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Balaji Ankush Kukade(I (Inspector)) / POBN85353 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** काशी शहर पोलीस ठाणे
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Balaji Ankush Kukad
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN85353